ठाणे, शनिवार दि. १७ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : ११० , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

## विधानसभा निवडणूक लांबणीवर

लोकसभा निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर राज्यात विधानसभा निवडणुकांकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे. गेल्या दोन-अडीच वर्षांत राज्यात राजकीय उलथापालथ झाली आहे. ......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७३,२८० | ९३,६८० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



मते दिली नाहीत तर त्या योजनेचा लाभ मिळणार नाही, असे मी तुमच्या फायद्यासाठीच म्हणालो. त्यामुळे वाद होऊन अखेर तुम्हाला

# संविधानावरचे संकट टळलेले नाही, राज्यात परिवर्तन करायचे आहे

**मुंबई – महाराष्ट्राचं चित्र बदलायचं असेल तर इथलं सरकार बदलल्याशिवाय गत्यंतर नाही असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार शुक्रवारी म्हणाले. षण्मुखानंद सभागृहातील महाविकास आघाडीच्या पदाधिकारी मेळाव्यात ते बोलत होते.**

शरद पवार यावेळी बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रावर जे संकट आहे, त्या संकटातून महाराष्ट्राची सुटका कशी करता येईल, यासंबंधीची दिशा महाराष्ट्राच्या खेड्या-पाड्या शहरांमधील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आजची ही सभा आहे. महाराष्ट्रात जे परिवर्तन करायचं आहे, त्यासाठी काय करण्याची गरज आहे याचं उत्तम मार्गदर्शन इथल्या वक्त्यांनी केलंय. महाराष्ट्राचा विचार करावाच लागेल, पण अजूनही देशावरचं संकट पूर्णपणे गेलं असा निष्कर्ष काढता येणार नाही. लोकसभेच्या निवडणुकीत आपण संविधानाबद्दल भूमिका मांडली. मी जबाबदारीने सांगतो लोकसभेत आपल्याला काही प्रमाणात यश आलं.



### महाराष्ट्रात सरकार बदलल्याशिवाय गत्यंतर नाही

महाराष्ट्राची निवडणूक दोन महिन्यांत होणार आहे. अतिशय कमी दिवस हातात आहेत. या दिवसांत आपण सर्वांनी सामान्य जनतेत जाऊन त्यांच्यात जागरुकता निर्माण करून परिवर्तनाचा विचार त्यांच्यात रुजवला पाहिजे. महाराष्ट्राचं चित्र बदलायचं असेल तर इथलं सरकार बदलल्याशिवाय गत्यंतर नाही. महाराष्ट्राची सत्ता बदलणं, चुकीच्या लोकांच्या हातून सत्ता काढणं हाच एककलमी कार्यक्रम आता आपला असेल.

## शरद पवारांचे सूचक विधान

पण संविधानावरील संकट पूर्णपणे गेलेलं नाही. कारण देशाची सूत्रे ज्यांच्या हातात आहेत. त्यांची संविधानात्मक संस्था आणि विचारधारेवर आस्था नाही. आज देशाचे पंतप्रधान संसदेची प्रतिष्ठा किती ठेवतात. राज्यसभेचे काही सदस्य व्यासपीठावर आहेत. ते तुम्हाला सांगतील. आताच संसदेचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात पंतप्रधान एक दिवसही संसदेत आले नाही. त्या सदनाची किंमत, त्याची प्रतिष्ठा, त्याचे महत्व याकडे ढुंकूनही न बघण्याची भूमिका आजच्या राज्यकर्त्यांची आहे. याची प्रचिती आम्हाला पावला-पावलावर बघायला मिळते.

■ **विरोधी पक्षनेत्यांचा सन्मान ठेवायलाच हवा–** जशी पंतप्रधानांची प्रतिष्ठा देशाने ठेवायला हवी, तशीच विरोधी (पान २ वर)

## सीएम पदाचा चेहरा जाहीर करावा – ठाकरे



मुंबई : महाविकास आघाडीने मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करावा, आमचा त्याला पाठिंबा असेल असं वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी केलं आणि आता महाविकास आघाडीमधील राष्ट्रवादी आणि काँग्रेससमोर पेच निर्माण झाला. ज्याच्या जागा जास्त त्याचा मुख्यमंत्री हे सूत्र धोकादायक असल्याचं त्यांनी सांगितलं. पण उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या या भूमिकेवर राष्ट्रवादीचे शरद पवार आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मात्र सावध भूमिका घेतल्याचं दिसतंय.

महाविकास आघाडीत मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करावा, जो कोणी चेहरा असेल त्याला पाठिंबा दिला जाईल अशी विनंती उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला केली. विधानसभा निकालानंतर ज्याच्या जागा जास्त त्याचा मुख्यमंत्री हा फॉर्म्युला महाविकास आघाडीसाठी धोकादायक असल्याचं उद्धव ठाकरे यांनी सांगितलं. मात्र मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करा असं सांगत उद्धव ठाकरे यांनी मुद्दामहून हा प्रश्न टाकल्याची चर्चा आहे. तर शरद पवारांनी उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्याबाबत केलेल्या वक्तव्यावर बोलणं टाळलं. त्यामुळे एकीकडे उद्धव ठाकरे यांना जरी मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करावा अशी भूमिका घेतली असली तरी महाविकास आघाडीमधील इतर पक्षाकडून मात्र अद्यापही या संदर्भात सावध भूमिका घेतलेली पाहायला मिळतंय. (पान २ वर)



■ मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबवल्याबद्दल राज्यातील महिलांनी काल (शुक्रवारी) सह्याद्री अतिथीगृहाच्या पायऱ्यांवर एकत्र जमून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राख्या बांधल्या. यावेळी महिलांनी लाडक्या भावाला ओवाळून त्यांनी दिलेल्या या आर्थिक मदतीबद्दल त्यांचे मनापासून आभार मानले.

# राख्यांवर मुख्यमंत्र्यांची छबी रक्षाबंधनाला राजकीय रंग!

**रक्षाबंधन काहीच दिवसावर येऊन ठेपला असून शहरातील बाजारांमध्ये राख्यांचे विविध प्रकार पाहायला मिळत आहेत. रक्षाबंधनास राजकीय रंग आल्याचे चित्र ठाण्यात दिसून आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे छायाचित्र असलेली राखी बाजारात दाखल झाली आहे. यासह कुंदन आणि भावाकरिता 'ब्रो' असा शब्द लिहलेली राखी यंदा मुख्य आकर्षण ठरत आहे.**



**ठाणे :** भाऊ-बहिणीचे नात्याची वीण जपणारा रक्षाबंधन सण काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यानिमित्त राखी खरेदी करण्याकरिता ठाणे शहरातील बाजारपेठांमध्ये गर्दी होऊ लागली आहे. यंदा शहरात विक्रेत्यांनी गुजरात, हैदराबाद, कर्नाटक अशा विविध ठिकाणांहून विक्रीसाठी राख्या आणल्या आहेत, तर काही विक्रेत्यांनी स्वत: तयार केलेल्या राख्या विक्रीसाठी ठेवल्या आहेत. यंदा राख्यांमध्ये ३० हून अधिक विविध प्रकार पाहायला मिळत आहेत. लहान मुलांसाठी विश्वचषक, कॅमेरा, मॅगी, बर्गर, स्कूटर, चंद्रयान, हत्ती अशा विविध गोष्टींच्या राख्या (पान २ वर)

**■ राख्यांचे दर**

- ■ कुंदन राखी – २५० रुपये
- ■ ब्रो नावाची राखी – १२५ रुपये
- ■ कार्टुन राखी – १० ते २०० रुपये
- ■ पर्यावरण पुरक राखी – १२० रुपये
- ■ गोंडा – १ ते १५ रुपये
- ■ सोन्याची राखी – ३००० ते ८००० रु.
- ■ चांदी राखी – ३०० रुपये
- ■ रेशीम राखी – २० ते ८० रुपये
- ■ फॅन्सी राखी – २०० रुपये.

कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील

# 27 गावात क्लस्टर योजना राबवणार; पाण्याचाही दिलासा

**कल्याण – २७ गावांतील धोकादायक तसेच अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण करून त्यांच्यासाठी क्लस्टर योजना राबवावी. त्यासाठी आराखडा तयार करण्यात यावा. यामुळे गावांचा विकास होण्यास गती मिळेल, अशा सूचना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्तांना केल्या आहेत.**

शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत कल्याण डोंबिवली महापालिकेसह कल्याण लोकसभा मतदारसंघातील विविध विषयांवर चर्चा पार पडली. यावेळी कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, तसेच राज्य शासनातील विविध विभागांचे उच्च पदस्थ अधिकारी उपस्थित होते. तसेच कल्याण डोंबिवली पालिकेच्या परिवहन सेवेत १९९९ मध्ये भरती झालेले आणि २०१३ मध्ये कायमस्वरूपी (पान २ वर)



### ...तर पाणी पुरवठ्याचा प्रश्न कायमचा निकाली लागेल

१ कल्याण डोंबिवली महापालिकेच्या अखत्यारीत मोठ्या प्रमाणात बांधकामे होत असून पाण्याची गरज वाढू लागली आहे. यामुळे या शहरांना अतिरिक्त पाण्याची गरज आहे. त्यामुळे बारवी धरणातून किमान ८० ते ८५ एमएलडी अतिरिक्त पाणी देण्यात यावे. सूर्या धरणाचे काम पूर्णत्वास गेल्यानंतर त्यातून देखील काही अतिरिक्त पाणी साठा उपलब्ध करून देण्यात यावा.

२ कुशिवली आणि काळू धरणाच्या उभारणीला गती देण्यात यावी. पोशिर धरणाचे काम देखील जलदगतीने पूर्णत्वास न्यावे. यामुळे केवळ कल्याण डोंबिवली महापालिकाच नव्हे तर अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर आणि आसपासच्या शहरांचा पाणी पुरवठ्याचा प्रश्न कायमचा निकाली लागेल आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, अशी मागणी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी यावेळी केली.

३ तर पोशिर धरणाचे काम एमएमआरडीएच्या माध्यमातून करण्यात आल्यास अधिक गतीने होईल, अशा सूचना केल्या. तसेच वाढत्या लोकसंख्येला पुरेल इतके पाणी पुरवण्यासाठी अमृत योजनेचे स्वरूप अधिक विस्तारित करण्यासाठी अतिरिक्त २०० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी द्यावी अशी मागणी

### क्लस्टरमुळे गावांचा विकास होण्यास गती

कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील २७ गावातील विविध प्रश्नांवर चर्चा झाली. २७ गावातील जिल्हा परिषदेच्या शाळांचा महापालिकेत समावेश करून घेण्यात यावा. तसेच गावातील धोकादायक, अनधिकृत बांधकामांच्या प्रश्नावर तोडगा काढण्याची मागणी खासदार डॉ. शिंदे यांनी केली. त्यावर बोलताना, या बांधकामांचे सर्वेक्षण करून त्यांच्यासाठी क्लस्टर योजना राबवावी त्यासाठी आराखडा तयार करावा. यामुळे गावांचा विकास होण्यास गती मिळेल, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आयुक्तांना केल्या.



### यूजीसी नेटची परीक्षा २७ ऑगस्टला होणार

सोमवार २६ ऑगस्ट रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या मुहूर्तावर रोजी होणारी UGC NET परीक्षा NTA कडून पुढे ढकलण्यात आली होती. २६ ऑगस्ट ऐवजी ही परीक्षा २७ ऑगस्टला होणार आहे. युजीसी नेट परीक्षेमध्ये ८३ विषयांचा समावेश असून ही परीक्षा २१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२४ पर्यंत असणार आहे.

### जुन्या शिवसेनेचा आणखीन एक चिरा निखळला; ज्येष्ठ शिवसैनिक शरद मोरे यांचे निधन

ठाणे – तब्बल पन्नास वर्ष शिवसेनेच्या ठाणे मुंबई मधल्या जडणघडणीचे साक्षीदार असलेले ज्येष्ठ शिवसेना पदाधिकारी, ठाणे शहर उपप्रमुख, परिवहन समितीचे माजी सभापती शरद मोरे यांचे काल १४ ऑगस्ट रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ७५ वर्षाचे होते. तब्बल पन्नास वर्षे शिवसेनेची सोबत केलेले शरद मोरे



प्रथम बाळासाहेब ठाकरे आणि नंतर धर्मवीर आनंद दिघे यांच्या सोबत तहहयात राहिले. दिघे साहेबांच्या पहिल्या पाच विश्वासू साथीदारांमध्ये त्यांचं नाव घेतलं जाई. अतिशय अटीतटीच्या काळात त्यांनी ठाण्याची परिवहन सेवा जिंकली होती. ते अनेक दिवस आजारी होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन पुत्र, सूना, नातवंड असा भला मोठा परिवार आहे. बुधवारी रात्री उशिरा त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ठाणे, मुंबईतील अनेक निकटवर्तीय उपस्थित होते.

### ऐतिहासिक ठाणे अंतर्गत मेट्रो प्रकल्पाला केंद्र सरकारची मान्यता

(सविस्तर वृत्त पान २)

# महिला बचतगटांच्या उत्पादनांना राष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी- ना. शिंदे

मुंबई – राज्यातील महिला बचतगट आणि महिला उद्योजकांनी तयार केलेल्या उत्पादनांना राष्ट्रीयस्तरावर बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी आर्टीफिशिअल इंटेलिजन्स आधारीत डिजीटल मार्केटींग प करावे. शहरांमध्ये बचतगटांची संख्या वाढवावी. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मैदांनावर सुटीच्या दिवशी बचतगटांसाठी स्टॉलची व्यवस्था करून द्यावी. ग्रामीण भागातील बचत गटांनी उत्पादीत केलेल्या वस्तू शहरांमधील बाजारपेठेत उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे याबाबत बैठक झाली. बैठकीस कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह आदी यावेळी उपस्थित हो

मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले, दोन दिवसांपासून राज्यातील महिला भगिनींच्या खात्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रक्कम जमा होत आहे. काल मी यातील काही भगिनींशी संवाद साधला. त्यांना मिळणारी रक्कम छोट्या व्यवसायासाठी उपयोगात आणणार असल्याचे त्यांच्या बोलण्यातून समजले. त्यामुळे आता महिला भगिनी करीत असलेल्या छोट्या-मोठ्या व्यवसायाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

राज्यात सुमारे ७ लाख ८२ हजार बचत गट कार्यरत असून उमेद अंतर्गत सुमारे सहा लाख, एनयुएलएम अंतर्गत ३१ हजार, माविम अंतर्गत ग्रामीण ८७ हजार आणि शहरी ६५ हजार असे बचत गट कार्यरत आहेत. महानगरांमध्ये बचत गट, महिलांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना स्टॉलची उभारणी करण्यासाठी महापालिकांनी पुढाकार घ्यावा. मोकळ्या जागा, मैदाने याठिकाणी काही दिवसांकरीता स्टॉलची उभारणी करून देण्यात यावी. जेणेकरून याठिकाणी हक्काची बाजारपेठ या गटांना मिळेल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. बचत गटांच्या वस्तूंना मोठी मागणी असते. त्याची दखल घेऊन राष्ट्रीयस्तरावर देखील त्याला बाजारपेठ मिळावी यासाठी उमेद, एनयुएलएम, माविम यांनी एकत्रित येऊन एक व्यासपीठ निर्माण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. यावेळी धर्मवीर आनंद दिघे महारोजगार पच्या माध्यमातून शासकीय स्तरावर असंघटीत कामगारांचे डिजीटल जॉबकार्ड तयार करण्याची संकल्पना यावेळी सादर करण्यात आली.

बैठकीस नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव (पान २ वर)

स्वर्गीय मीनाताई ठाकरे प्रसुतीगृहाच्या नूतनीकृत वास्तूचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले लोकार्पण

# चांगल्या कामासाठी मुख्यमंत्री निधी खर्च झाला याचे समाधान–मुख्यमंत्री शिंदे

ठाणे –ठाणेकरांच्या आरोग्यासाठी उपयुक्त अशी विनामूल्य सुविधा स्वर्गीय मीनाताई ठाकरे प्रसुतीगृह आणि डायलिसिस केंद्राच्या रूपाने मिळाली आहे. चांगल्या कामासाठी मुख्यमंत्री निधी खर्च झाला याचे समाधान मला या लोकार्पण सोहळ्यामुळे मिळाले आहे, असे प्रतिपादन मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात केले. ठाणे महानगरपालिकेच्या, वागळे इस्टेट येथील शिवाजीनगर भागातील जुन्या स्वर्गीय मीनाताई ठाकरे प्रसूतीगृह आणि डायलिसिस केंद्राच्या अद्ययावत नुतनीकृत वास्तूचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बुधवारी सायंकाळी झाले. या इमारतीचे काम संरचनात्मक दुरुस्ती करून पूर्ण झाले आहे. सर्व सोयींनी युक्त असे वातानुकूलित प्रसुतीगृह आणि डायलिसिस केंद्र नागरिकांसाठी खुले झाले आहे.

या कार्यक्रमास, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी नगरसेवक राम रेपाळे, दिलीप बेतकर, माजी नगरसेविका जयश्री फाटक, सुखदा मोरे, अतिरीक्त आयुक्त संदीप माळवी, प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त उमेश बिरारी, मनीष जोशी, जी. जी. गोदेपूरे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. चेतना नितील, वैद्यकीय अधिकारी डॉ. राणी शिंदे, कार्यकारी अभियंता भगवान शिंदे आदी (पान २ वर)






### स्वर्गीय मीनाताई ठाकरे प्रसुतीगृह आणि डायलिसिस केंद्र

त्याचबरोबर, माता बालसंगोपन कार्यक्रमांतर्गत दररोज प्रसुतीविषयक सेवा, नॉर्मल व सिझेरियन प्रसूती, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, कुटुंब कल्याण साधने, महिलांच्या आजारासंबंधित दैनंदिन स्त्री रोग तज्ज्ञ यांच्याद्वारे कन्सल्टेशन, गरोदर मातांच्या रक्त चाचण्या,गरोदर मातेची सोनोग्राफी तसेच प्रसूती पश्चात द्यावयाच्या सेवा , नवजात शिशुची काळजी घेण्यासाठी न्यू बॉर्न स्टेबलायझेशन युनिट ज्यामध्ये फोटोथेरेपी, बेबी वॉर्मर यासुविधा उपलब्ध होणार आहेत.

**डायलिसिसच्या सेवा मोफत उपलब्ध –** तसेच या ठिकाणी सात खाटांचे डायलिसिस केंद्र सुरू करण्यात येत आहे . याकरिता डायलिसिस मशीन या सीएसआरच्या माध्यमातून फेरफॅक्स इंडिया व सीएसबी बँक यांच्यामार्फत मोफत उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. हे डायलेसिस केंद्र हे मेसर्स अपेक्स किडनी केअर प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेमार्फत चालवण्यात येणार असून डायलिसिसच्या सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## विधानसभा निवडणूक लांबणीवर

लोकसभा निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर राज्यात विधानसभा निवडणुकांकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले आहे. गेल्या दोन-अडीच वर्षांत राज्यात राजकीय उलथापालथ झाली आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात पुढच्या पाच वर्षांसाठी कोण बसणार, सत्तेच्या चाव्या कुणाच्या हाती असणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद नुकतीच झाली असून झालेल्या पत्रकार परिषदेत निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी महाराष्ट्रातील निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केलेला नाही. परंतु, कार्यक्रम जाहीर न करण्यामागचे कारण मात्र त्यांनी सांगितले आहे. परंतु असे दिसते की, विद्यमान सरकारला योजना जाहीर केल्यानंतर वेळ मिळावा यासाठी निवडणूक आयोगाच्या धडपड सुरू आहे की काय अशी शंका येते. तसेच विधानसभेची मुदत नोव्हेंबरमध्ये संपत आहे. तोवर निवडणूक आयोग राज्यातील विधानसभा निवडणूक जाहीर करणार नाही असे दिसते. कलम ३७० हटवल्यानतंर जम्मू काश्मीरमध्ये पहिल्यांदाच निवडणुका होणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून जम्मू काश्मीरमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. सातत्याने दहशतवादी हल्ले होत आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या काळात सर्व उमेदवारांना कडेकोट सुरक्षा पुरवण्यात येणार आहे. त्यामुळे या काळात महाराष्ट्रात निवडणुका घेतल्या जाणार नसल्याचे स्पष्टीकरण आयुक्त राजीव कुमार यांनी दिले आहे. सद्यकाळात राज्यात निवडणूक घेतली तर राज्यात सुरक्षा पुरवण्यात अडचण येणार आहे. विधानसभा निवडणूक लांबणीवर टाकण्याचे हेही एक कारण आहे. जम्मू-काश्मीरच्या सुरक्षा आवश्यकतांमुळे महाराष्ट्रातील निवडणुका नंतर जाहीर केल्या जातील, असे स्पष्टीकरण राजीव कुमार यांनी दिले आहे. निवडणूक आयुक्तांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रात पाऊस आहे. अनेक सण उत्सव आहे. गणेशोत्सव, पितृपक्ष, नवरात्री, दिवाळी हे सण आहे. त्यामुळे येत्या सहा महिन्यांत इथेही निवडणुका होतील. राज्यातील महायुती व महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्या निवडणुकीच्या दृष्टीने कामाला लागल्या असून आधी जागावाटप व नंतर उमेदवार निश्चिती अशी प्रक्रियाही सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर एकीकडे लोकसभा निवडणुकांच्या निकालांची अद्याप चर्चा होत असताना विधानसभा निवडणुका मात्र लांबणीवर पडल्या आहेत. विद्यमान महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर रोजी संपुष्टात येत आहे. त्यापूर्वीच राज्यात नवीन सरकार अस्तित्वात येणे आवश्यक आहे. मात्र, अपवादात्मक परिस्थितीत राज्यपाल ही मुदत वाढवू शकतात. या पार्श्वभूमीवर निवडणुकांना उशीर होण्याची शक्यता गृहीत धरली जात आहे. त्यामुळे आता दिवाळीनंतरच राज्यात विधानसभा निवडणुका लागण्याची शक्यता आहे. निवडणुका जाहीर झालेल्या नसल्या तरीही राज्यातील अनेक राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवत लोकसभा निवडणुकीतील पराभवाचे चिंतन करून यानेक राजकीय पक्षांनी आतापासूनच प्रचाराला सुरुवात केली आहे. अनेक पक्षांनी मोहिमा, अभियान, मतदार संपर्क यात्रा सुरू केल्या असून जागावाटपाचीही चर्चा जोरात सुरू झाली आहे. राज्यातील शिवसेना ठाकरे गट, शरद पवार राष्ट्रवादी गट आणि राष्ट्रीय काँग्रेस एकत्र लढणार असे ठरले आहे. महाविकास आघाडीत सर्व पक्षांनी एकत्रित निवडणूक लढण्यावर भर दिसतो. परंतु महायुतीत अजित पवार राष्ट्रवादी गटाने आगामी विधानसभा निवडणूक सोडून स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक स्वबळावर लढण्याचा नुकताच इशारा दिला होता. तसेच लोकसभा निवडणुकीवेळी शिवसेना शिंदे गटातील काही नेत्यांना उमेदवारी मिळाली नव्हती. हा पूर्वानुभव लक्षात घेता भाजपासोबत जागावाटप कसे होणार याबाबत संभ्रम वाटतो. महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपुष्टात येत असल्याने अजून दोन महिन्यांपेक्षा अधिक कालावधी आहे. तसेच एवढ्या लवकर निवडणूक घेणे हे सत्ताधारी महायुतीसाठी सोयीचे नव्हते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, अन्नपूर्णा योजना, लाडका भाऊ आदी लोकप्रिय घोषणांचा लोकांना लाभ मिळाला तरच त्याचा निवडणुकीत सत्ताधारी पक्षांना फायदा होऊ शकतो. यामुळेच निवडणूक लांबणीवर जाणे हे सत्ताधारी पक्षाला आवश्यकच होते. याउलट लोकसभा निवडणुकीतील महायुतीच्या विरोधातील लोकांमधील कल किंवा सत्ताधाऱ्यांच्या विरोधातील संताप अजून प्रगट होण्याकरिता विधानसभेची निवडणूक दिवाळीपूर्वी होणे महाविकास आघाडीसाठी फायद्याचे होते. लोकसभा निवडणुकीत राज्यातील ४८ पैकी ३० जागा महाविकास आघाडी तर १७ जागा महायुतीने जिंकल्या होत्या. तेव्हा विधानसभा मतदारसंघांचा विचार करता महाविकास आघाडीला १६० च्या आसपास तर महायुतीला १२५ च्या आसपास मतदारसंघांमध्ये आघाडी मिळाली होती. आधीच महायुती सरकारने लोकप्रिय घोषणांचा सपाटा लावला आहे. त्यात महायुतीकडे पुरेशी साधने असल्याने महाविकास आघाडीसाठी पाऊण महिना निवडणूक लांबणे गैरसोयीचे ठरणार आहे. तसेच राज्यातील महायुती सरकारने ज्या योजना राबवायला सुरुवात केल्या आहेत, त्याचा प्रभाव त्यांना मिळणाऱ्या मतांवर पडेल की नाही हे येत्या काळात विधानसभा निवडणुकीच्या निकाळानंतरच समजेल. परंतु केंद्रीय निवडणूक आयोगाचा राज्यात लवकर निवडणूक न घेण्याचा निर्णय महायुतीला पूरक ठरण्याची शक्यता महायुतीच्या नेत्यांना वाटते. निवडणूक आयोग अर्थात केंद्र सरकारच्या इशाऱ्यावर काम करीत आहे, असे दिसते.

# ऐतिहासिक ठाणे अंतर्गत मेट्रो प्रकल्पाला केंद्र सरकारची मान्यता

ठाणे (१६): वर्षानुवर्षे ठाणेकरांना प्रतीक्षा असलेल्या ऐतिहासिक ठाणे अंतर्गत अंतर्गत मेट्रो प्रकल्पाला आज, शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सततचा पाठपुराव्यामुळे या योजनेला मंजुरी मिळाली असून लवकरच ही महत्वाकांक्षी योजना मार्गी लागणार आहे. दरम्यान अंतर्गत मेट्रो प्रकल्प हा ठाणे शहरासाठी ऐतिहासिक प्रकल्प असल्याची प्रतिक्रिया राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे. तसेच या प्रकल्पाला मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

या प्रकल्पामुळे ठाणे शहरातील वाहतुकोंडीचा प्रश्न मार्गी लागणार असून पायाभूत सुविधांच्या बाबतीत हे शहर सुसज्ज शहराच्या यादीत झळकणार आहे.

### ठाणे शहरासाठी हा ऐतिहासिक प्रकल्प – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

हा प्रकल्प ठाणे शहरासाठी ऐतिहासिक निर्णय आहे. केंद्र सरकार आणि राज्य शासन यांच्यातील समन्वयामुळे या प्रकल्पाला वेग येईल. या मेट्रो रेल्वे प्रकल्पाला मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय शहरे विकास मंत्री मनोहरलाल खट्टर, तत्कालिन केंद्रीय शहरे विकास मंत्री हरदीप सिंह पुरी यांचे आभार मानले आहेत.

या प्रकल्पाला मंजुरी मिळाल्यामुळे ठाणेकरांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहे. सुमारे १२, २०० कोटी रुपयांच्या आणि २९ किमी अंतराच्या या प्रकल्पात २२ स्थानके आहेत. या प्रकल्पामुळे मूळ ठाणे शहरातील वाहतूक कोंडी दूर होण्यास मदत मिळणार आहे. नौपाडा, वागळे इस्टेट, डोंगरी पाडा, हिरानंदानी इस्टेट, कोलशेत, साकेत या भागातून ही रिंग मेट्रो रेल्वे जाणार आहे. हा महत्वाकांक्षी प्रकल्प महामेट्रोच्या माध्यमातून

**प्रकल्पामुळे मूळ ठाणे शहरातील वाहतूक कोंडी दूर, तसेच शहरातील विविध भागांशी थेट रिंग मेट्रो मार्गाने प्रवास शक्य**

उभारण्यात येणार असून त्यासाठी, केंद्र आणि राज्य सरकार समसमान निधी उभारणार आहेत. या प्रकल्पाची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाली असून




साधारणतः सन २०२९ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण होणार आहे. या प्रकल्पाचा लाभ अंदाजे ६.४७ लाख प्रवाशांना मिळणार आहे.

## संविधानावरचे संकट टळलेले नाही, राज्यात परिवर्तन करायचे आहे

**(पान १ वरून)** पक्षनेत्याचीही प्रतिष्ठा तितकीच महत्वाची आहे. काल लाल किल्ल्यावरील स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात विरोधी पक्षनेते हे मागच्या रांगेत बसले होते. मी स्वतः विरोधी पक्षनेता होतो. अटलजींचे सरकार होते. मला आठवतं तेव्हा माझी बसण्याची व्यवस्था कॅबिनेट मंत्र्यांच्या बरोबरीची असायची. मला आठवतंय मनमोहन सिंग पंतप्रधान होते. सुषमा स्वराज विरोधी पक्षनेत्या होत्या. १५ ऑगस्टच्या कार्यक्रमात त्या कॅबिनेट मंत्र्यांच्या रांगेत बसलेल्या होत्या. याचा अर्थ प्रश्न व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा नाही. त्या संस्थांच्या प्रतिष्ठेचा आहे. ते संस्था आहेत. लोकशाहीतील ते संस्था आहेत. आणि त्यांचा सन्मान करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांची आहे. मात्र खरगे असो किंवा राहुल गांधी असो त्यांच्या सन्मानाची अपेक्षा जरी आपण ठेवली तरी ती त्यांच्याकडून ठेवली गेलेली नाही. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे या लोकशाहीच्या संस्था आणि पद्धतींवर यत्किंचितही विश्वास नसलेले लोक देशाच्या सत्तास्थानी बसलेत. त्यामुळे आपण अतिशय जागरूक राहण्याची गरज आहे.

■ **विरोधी पक्षाच्या जागरुकतेमुळे जनसुरक्षा कायदा थांबला** – आजच्या सरकारने एक नवीन कायदा आणण्याचा निर्णय घेतला होता. त्याचं नाव जनसुरक्षा कायदा होत. तो कायदा यांनी विधीमंडळात आणला. आपल्या सर्व सदस्यांनी मुख्यमंत्री आणि अध्यक्षांना हा कायदा थांबवण्याची विनंती केली. आपल्या लोकांच्या जागरुकतेमुळं हा कायदा सध्या थांबलाय. कायदा असा आहे, जर तुम्ही एकट्याने रस्त्यावर कुठेही निदर्शने करायंच ठरवलं तर तुम्हाला अटक करून पाच ते सात वर्ष तुरुंगात ठेवण्याचा अधिकार मिळणार आहे. साधं आंदोलन केल्यास. एक माणूस असो, दहा वा पंचवीस जणं असो, त्यांनी निदर्शनं केली त्यांच्या अटकेची तरतूद या कायद्यात आहे. अशा अनेक तरतूदी आहेत. विरोधी पक्ष जागरूक होता आणि अध्यक्षांनी त्यांचं ऐकलं म्हणून हा कायदा तात्पुरता थांबला आहे. अशा अनेक गोष्टी आहेत. ज्यासाठी सत्तेचा गैरवापर भाजप करत आहे. यापासून महाराष्ट्राची सुटका करणं हे महत्वाचं काम आणि आव्हान आपल्या सर्वांसमोर आहे. त्यामुळे आपण सर्वांनी एकजुटीने निवडणुकीला सामोरे जाऊन यश मिळवायचे आहे, सरकार बदलायचे आहे.

## सीएम पदाचा चेहरा जाहीर करावा – ठाकरे

**(पान १ वरून)** मात्र प्रमुख नेत्यांनी मुख्यमंत्रीपदाबाबत जरी सावध भूमिका घेतली असली तरी इतर नेत्यांनी मात्र उद्धव ठाकरे हे प्रचाराचे प्रमुख असतील असे संकेत दिले.

जो पहिले भाषण करतो तो प्रचार प्रमुख असतो असं म्हणत जयंत पाटील यांनी उद्धव ठाकरे संदर्भात भाष्य केलं. तर नसीम खान यांनींही तोच सूर ओढला . त्यानंतर वर्षा गायकवाड यांनी सुद्धा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना मुख्यमंत्री नाही तर कुटुंबप्रमुख म्हणून राहिले आणि ते कुटुंबप्रमुख आहेत असं आपल्या भाषणात म्हटलं.

या सगळ्या संदर्भात महाविकास आघाडीचे प्रचार प्रमुख हे उद्धव ठाकरे असतील का असं जयंत पाटील यांना विचारलं. त्यावर उद्धव ठाकरेंसारखे व्यक्ती त्या स्तराचे आहेत अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आणि योग्य वेळी याबाबत निर्णय होईल असं सांगितलं.

त्यामुळे मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करण्यावरून उद्धव ठाकरे यांचा आग्रह आणि इतर प्रमुख नेत्यांची सावध भूमिका असं सगळं चित्र आजच्या महाविकास आघाडीच्या मेळाव्यात पाहायला मिळालं.

## २७ गावात क्लस्टर योजना राबवणार; पाण्याचाही दिलासा

**(पान १ वरून)** कामावर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना मागील काही वर्षांचे थकीत वेतन देणे यावरही यावेळी सकारात्मक निर्णय घेण्यात आला.

उल्हासनगर महापालिकेत स्थानिक संस्था कर अर्थात लोकल बॉडी टॅक्स भरण्यासाठी वाढीव मुदत देण्यात यावी, यांसह अनेक महत्वाच्या विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री यांनी सर्व विषय विहित वेळेत मार्गी लावण्यात येतील, असे आश्वासन दिले.

■ **पेंढारकर कॉलेजचा मुद्दा....** – डोंबिवली येथील पेंढारकर कॉलेजचा मुद्दा सध्या चर्चेत आहे. ही कॉलेज अनुदानित असून येथील मॅनेजमेंट कॉलेज खासगी करण्याच्या मार्गावर आहे. कॉलेजचे खासगीकरण झाल्यास येथील विद्यार्थ्यांच्या फी मध्ये बेसुमार वाढ होईल. तसेच शिक्षकांच्या मानधनावर देखील परिणाम होईल. यामुळे शिक्षक कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ शकते. यामुळे कॉलेजवर शासनाच्या वतीने तातडीने प्रशासक नेमण्यात यावा. जेणेकरून कॉलेजच्या कारभारावर शासनाकडून देखरेख ठेवण्यात येईल. याबाबत तातडीने कार्यवाही करण्याच्या मुख्यमंत्र्यांनी सबंधित विभागाला सूचना केल्या.

■ **विकासकांना येणारे अडथळे दूर होणार** – राष्ट्रीय स्तरावरील नियोजक व मार्गदर्शक तत्वे 'शहरी विकास योजना 'तयार करणे व त्यावर मार्गदर्शक तत्वे तयार करून अंमलवजावणी करणे यामध्ये त्यांच्या मार्गदर्शक तत्वात कल्याण डोंबिवली महानगरपालीका व ठाणे महानगरपालिका या एकाच कॅटेगरीमध्ये येतात.

त्यामुळे शहरे व विकास योजनेतील तरतुदी या मध्ये ठाणे प्रमाणेच कल्याण डोंबिवली शहराला देखील नियमावली लागू करण्यात यावी, अशी मागणी यावेळी एमसीएचआयने केली. असे केल्याने विकासकांना येणारे अडथळे दूर होणार आहे. यावर त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना मुख्यमंत्री यांनी यावेळी केल्या.

## राख्यांवर मुख्यमंत्र्यांची छबी रक्षाबंधनाला राजकीय रंग!

**(पान १ वरून)** दाखल झाल्या आहेत. ठाण्यातील वामाक्षी राखी या दुकानांत १०० महिलांच्या मदतीने राखी तयार केली जाते. येथे एक रुपयांपासून राख्या विक्रीसाठी उपलब्ध आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ठाणे शहरातील असल्याने खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या छायाचित्राची राखी येथे मोफत दिली जात आहे, असे विराग गांगर यांनी सांगितले.

## महिला बचतगटांच्या उत्पादनांना राष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी– ना. शिंदे

**(पान १ वरून)** राजगोपाल देवरा, वित्त विभागाच्या अपर मुख्य सचिव ए. शैलजा, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव गोविंदराज, महिला व बालविकास विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील आदी उपस्थित होते.

## स्वर्गीय मीनाताई ठाकरे प्रसूतीगृहाच्या नुतनीकृत वास्तूचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले लोकार्पण

**(पान १ वरून)** मान्यवर उपस्थित होते. प्रसुतीगृहाची वास्तू अतिशय सुंदर तयार केली आहे. व्यवस्थाही अद्ययावत दिल्या आहेत. त्यांची काळजी घेणे आणि नीट वापरणे यांची जबाबदारी येथील डॉक्टर्स आणि कर्मचारी यांची आहे. मी कधीही अचानक पुन्हा भेट देईन तेव्हा हे प्रसुतीगृह मला याच स्थितीत दिसले पाहिजे, अशी अपेक्षा याप्रसंगी मुख्यमंत्री महोदय यांनी व्यक्त केली.

श्रीनगरमधील मातोश्री गंगुबाई शिंदे रुग्णालयासाठी नवीन इमारत घेण्यात येत आहे. त्यामुळे तेथेही रुग्ण खाटा वाढणार आहेत. याचा लाभ नागरिकांना होणार आहे. हॉस्पिटलच्या बिलाची नागरिकांनी चिंता करायची नाही. ती चिंता सरकार करत आहे. महात्मा फुले योजनेत राज्याची सर्व लोकसंख्या पात्र केलेली आहे, असेही मुख्यमंत्री महोदय म्हणाले.

■ **प्रशिक्षण नियुक्ती पत्रे प्रदान** – मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत पात्र ठरलेल्या १० प्रातिनिधिक प्रशिक्षणार्थींना ठाणे महापालिकेतील प्रशिक्षण नियुक्ती पत्रे प्रदान मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते याच सोहळ्यात देण्यात आली. त्यात एका दीव्यांग युवकाची समावेश होता. ठाणे महापालिकेत ५४३ तर परिवहन सेवेत १७२ युवकांना अशाप्रकारे प्रशिक्षण नियुक्ती दिली जाणार आहे. अशा प्रशिक्षणार्थींना दरमहा प्रशिक्षण भत्ता देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचे मा. मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

या प्रसंगी, मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उत्तम वास्तू व व्यवस्था उभी केल्याबद्दल नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, कार्यकारी अभियंता भगवान शिंदे, उपायुक्त (आरोग्य) उमेश बिरारी, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. चेतना नितील, वैद्यकीय अधिकारी डॉ. राणी शिंदे, फेरफॅक्स इंडिया, सीएसबी बँक आणि अपेक्स किडनी केअर प्रायव्हेट लिमिटेड यांच्या प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

ठाणे महापालिका क्षेत्रात माता बाल संगोपन कार्यक्रम राबविताना येणाऱ्या विविध अडचणींचा विचार करून त्यावर मात करण्यासाठी मुख्यमंत्री मातृत्व सुरक्षा योजना ही राबवण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत माता बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट प्रतीच्या सेवा देण्यासाठी प्रसूतीगृहांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. वागळे प्रभाग समिती अंतर्गत १० खाटांचे स्वर्गीय मीनाताई ठाकरे प्रसूतीगृह मागील तीस वर्षापासून कार्यान्वित आहे. या इमारतीचे बांधकाम जुने असल्याने या ठिकाणी पाण्याची गळती तसेच फ्लोर स्लॅब पडणे यामुळे नादुरुस्त झाली होती. मुख्यमंत्री मातृत्व सुरक्षा योजनेअंतर्गत सुमारे तीन कोटी ७८ लाख रुपये खर्च करून या वास्तूचे मजबुतीकरण व बळकटीकरण करण्यात आलेले आहे.

स्वर्गीय मीनाताई ठाकरे प्रसुतीगृह येथे आता, ०७ खाटांचा ए.एन.सी. वॉर्ड, १० खाटांचा पी. एन .सी. वॉर्ड, दोन खाटांची रिकवरी रूम, न्यू बॉन्सेबलायझेशन युनिट, लेबर रूम, मॉड्युलर ओटी (अद्यावत शस्त्रक्रिया गृह), ओपीडी, प्रयोगशाळा तपासण्या, सोनोग्राफी तपासणी, सात खाटांचे डायलिसिस केंद्र या सुविधांचा समावेश आहे.



## अंबरनाथच्या आनंदनगर येथील गणपती मंदिरावर स्वातंत्र्य दिनानिमित्त आकर्षक सजावट

अंबरनाथ – अंबरनाथच्या आनंदनगर एमआयडीसी येथील के १ परिसर सहकारी सोसायटी असून या सोसायटीत गणपतीचे मंदिर आहे, स्वातंत्र्य दिनानिमित्त या मंदिरावर के १ परिसर सहकारी सोसायटी व मित्र परिवारातर्फे आकर्षक सजावट करून गणपतीचे पूजन करत देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिन आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला, या मंदिरावर करण्यात आलेल्या आकर्षक सजावटीला बघण्यासाठी आजू-बाजूच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी गर्दी केली होती, यावेळी नागरिकांसह सोसायटीतील उपस्थित नागरिकांना लाडूचे वाटप करण्यात आले.

**के १ परिसर सहकारी सोसायटी व मित्र परिवाराने केली सजावट**

# स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्र राज्यातील ४८ लाख लाडक्या बहीणींना दोन महिन्याचे तीन हजार रुपये बँक खात्यात डायरेक्ट ट्रान्सफर – आनंद परांजपे





ठाणे – राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार आणि महिला व बालविकास मंत्री ना. आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची ठाणे शहरात तसेच राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करुन १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त ४८ लाख लाडक्या बहीणींना दोन महिन्याचे तीन हजार रुपयांचे दोन हप्ते त्यांच्या बँक खात्यात डायरेक्ट ट्रान्स्फर केले गेले असल्याची माहिती प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांनी दिली आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्यातील ४८ लाख लाडक्या बहिणींना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा प्रत्यक्ष फायदा मिळाला असून त्यांच्या बँक खात्यात प्रत्येकी ३ हजार रुपयांची रक्कम डायरेक्ट ट्रान्स्फर झाली असल्याची माहिती प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांनी दिली आहे. यानिमित्ताने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रक्कम महिला भगिनींना प्राप्त झाल्याबद्दल राष्ट्रवादी ठाणे मध्यवर्ती कार्यालयात ढोल ताशाच्या गजरात, पेढे भरवून, फटाके वाजवून व महायुती सरकार आणि अजितदादांचा समर्थनार्थ महिलांनी जोरदार घोषणा देऊन आसमंत दणाणून सोडला.

याप्रसंगी माजी नगरसेविका वहिदा खान, अंकिता शिंदे, महिला अध्यक्षा वनिता गोतपागर, महिला कार्याध्यक्षा मनिषा भगत, विधानसभा अध्यक्षा सुवर्णा खिल्लारी, अरुणा पेंढारे, विधानसभा कार्याध्यक्षा लक्ष्मी वैती, सरचिटणीस उज्वला येडे, ब्लॉक अध्यक्षा शामा भालेराव, मनिषा कांबळे, वॉर्ड अध्यक्षा शामल दाभाडे, लता चव्हाण, मानसी चव्हाण, स्वाती जाधव, प्रभावती कुंदे, माया केसरकर, अर्चना कदम, जया कदू, शशिकला पवार, युवती विधानसभा अध्यक्षा सोनिया माने, वॉर्ड अध्यक्षा सरिता जाधव, दिपाली विचारे, निलोफर बांगी, रजिया शेख, वंदना नाईकनवरे, यासमीन शेख, जयबुनिसा शेख, रुकसाना नाईक, गुलनार इद्रिसी, साहिका खान आदी पदाधिकारी उपस्थित होत्या.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय,भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - ४०१ १०१
माहिती व तंत्रज्ञान विभाग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
संकेतस्थळ - www.mbmc.gov.in ई-मेल Email :- it@mbmc.gov.in संपर्क -२८१९२८२८-२५१

जा.क्र. मनपा/माहिती व तंत्रज्ञान/१७२/२०२४-२५ दि. १४/०८/२०२४

**// ई- लिलाव सूचना //**

मिरा भाईंदर महानगरपालिका माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत कालबाह्य झालेले संगणक व इतर आयटी उपकरणे जेथे आहेत व ज्या स्थितीत आहेत त्याच स्थितीत ई लिलावाद्वारे उच्चतम असलेल्या बोलीदारास विकणे आहेत. सदर लिलावासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ किंवा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराना जाहीर लिलाव e-auction पद्धतीने दि. २९/०८/२०२४ रोजी करण्यात येणार आहे.

| अ. क्र. | तपशील | सन | लिलावाची वेळ | देकाराची किमान रक्कम | फॉर्म फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कालबाह्य झालेले संगणक व इतर आयटी उपकरणे. | २००५ ते २०१८ | स. ११.०० वाजता ते दु. १२.३० वाजेपर्यंत | रु.२,४९,८३८/- | १८००/- + ३२४/- (१८% GST) = २१२४/- Non Refundable | रु.९०००/- Refundable |

तरी ज्या इच्छुक व्यक्तीस / संस्थेस वरील लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी वरील दिवशी व निश्चित केलेल्या वेळेत मिरा भाईदर महानगरपालिका दि.२९-०८-२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासुन बोली दर रक्कम ऑनलाईन सादर करावी. सदर बोली स्विकारण्याची वेळ वर दिलेल्या तक्यात नमुद केलेली आहे. उपरोक्त तक्यामध्ये मनपाने निश्चित केलेल्या किमान रक्कमेच्या वरती कमीत कमी बोलीची रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी दहा हजार रूपये) च्या टप्प्याने वाढवावी लागेल. तक्त्यामध्ये नमूद केलेली बोली Auto Extension (स्वयम विस्तार) पध्दतीने चालु राहील. सदर बाजार लिलावासाठी ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची मुदत दि. १९-०८-२०२४ ते दि. २६-०८-२०२४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यत राहील व लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी फॉर्म फी व इसारा रक्कम वर नमूद केल्याप्रमाणे RTGS व्दारे मनपाच्या अधिकृत बँक खात्यावर भरणा केल्यानंतर अर्जदारास लिलावात भाग घेता येईल.

जा.क्र. मनपा/ मावज/E-२६१२१४१/२०२४-२५
दि. १६/०८/२०२४

सही/-
(श्री. राजकुमार एम. घरत)
सिस्टीम मॅनेजर
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक आरोग्य विभागाकडील " वैद्यकीय अधिकारी व लेप्रसी असिस्टंट " या संवर्गातील पद कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी जाहिरात.

ठाणे महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आस्थापनेवरील कार्डिअक ॲम्ब्युलन्स करिता " वैद्यकीय अधिकारी " व कुष्ठरुग्ण करीता " लेप्रसी असिस्टंट " या संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधन तत्त्वावर सहा महिन्याच्या (१७९ दिवस) कालावधीकरीता भरणेसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी कै.अरविंद कृष्णाजी पेंडसे सभागृह, स्थायी समिती सभागृह, तिसरा मजला, प्रशासकीय भवन, सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी पाचपाखाडी, ठाणे येथे दि.२३/०८/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता थेट मुलाखतीस (Walk In Interview) उपस्थित रहावे. उमेदवारांनी सर्व कागदपत्र/प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी दोन प्रतींमध्ये स्वयंसाक्षांकित/प्रमाणित करुन सादर करावीत. जाहिरातीमध्ये नमूद शैक्षणिक अर्हता धारण करत नसलेले उमेदवार मुलाखतीस अपात्र ठरतील. शैक्षणिक अर्हता व अनुभवाची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांचीच मुलाखत घेतली जाईल. ठाणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या आस्थापनेवरील " वैद्यकीय अधिकारी व लेप्रसी असिस्टंट " संवर्गातील पदे भरावयाची असून त्यांची पदसंख्या व शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे.

| अ. क्र. | पदनाम व पद संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | दरमहा मानधन | वय |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी पदसंख्या – ११<br>अनु.जाती ०२<br>अनु.जमाती ०१<br>भ.ज (ब) ०१<br>इमाव ०२<br>आ.दु.घ. ०१<br>खुला ०४<br>एकूण ११ | १.मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यक शास्त्रातील पदवी (एम.बी.बी.एस.).<br>२.राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग अथवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन (Parmanent) असणे आवश्यक.<br>३.मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | ४०,०००/- | शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१५/ प्र.क्र.४०४/कार्या.१२, २५ एप्रिल २०१६ अन्वये कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागास प्रवर्गासाठी ४३ वर्षे. |
| २ | लेप्रसी असिस्टंट पदसंख्या – ०१ | १.महाराष्ट्र राज्य शासनाने मान्यता दिलेल्या शिक्षण मंडळाची, उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण (H.S.C)<br>२.शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/ खाजगी वैद्यकीय रुग्णालयातील लेप्रसी असिस्टंट अथवा समकक्ष कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>३.मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | २५,०००/- | |

मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मान्यतेने.
ठामपा/पिआरओ/आस्था/ ३०२/२०२४-२५
दि:१६.०८.२०२४
**pls visit our official web-site www.thanecity.gov.in**

**सही/-**
अतिरिक्त आयुक्त -२
ठाणे महानगरपालिका ठाणे.

## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार - २ नायब सुभेदार -

■ क्रीडा पात्रता: ॲथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.

■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण

■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.

■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011

■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४

■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## महाराष्ट्र राज्य नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

■ जाहिरात क्र.: ०१/२०२४

■ जागा : २८९

■ पदाचे नाव :
१ रचना सहायक (गट ब)
२ उच्चश्रेणी लघुलेखक (गट ब)
३ निम्न श्रेणी लघुलेखक (गट ब)

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: स्थापत्य किंवा ग्रामीण आणि स्थापत्य/नागरी व ग्रामीण किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान डिप्लोमा
पद क्र.२: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १२० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १०० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.

■ वयाची अट: २९ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र

■ फी : खुला प्रवर्ग: १०००/- मागासवर्गीय: ९००/-

■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४

■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.

■ अधिकृत वेबसाईट https://dtp.maharashtra.gov.in/

## भारतीय रेल्वे

■ जागा : ७९५१

■ पदाचे नाव :
१ केमिकल सुपरवाइजर/रिसर्च
२ मेटलर्जिकल सुपरवाइजर/रिसर्च
३ ज्युनियर इंजिनिअर
४ डेपो मटेरियल सुपरिटेंडंट
५ केमिकल मेटलर्जिकल असिस्टंट




■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: केमिकल टेक्नोलॉजी पदवी.
पद क्र.२: मेटलर्जिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)
पद क्र.४: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.५: ४५% गुणांसह B.Sc (Physics/Chemistry)

■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत

■ Fee: General/OBC/EWS: 500/- SC/ST/ExSM²/ट्रान्सजेंडर/EBC/महिला: २५०/-

■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४

■ अर्ज दुरुस्ती: ३० ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर

■ वेबसाईट https://indianrailways.gov.in/

# वसई- पालिकेची ११ आरोग्य केंद्रे सेवेत

वसई- वसई विरार महापालिकेने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून नागरिकांसाठी ११ आरोग्य केंद्र सेवेत आणली आहेत. त्यामध्ये ३ बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आणि ८ आरोग्य वर्धिनी केंद्रांचा समावेश आहे. राज्य शासनाने दिलेल्या १५ पैकी १४ आपला दवाखाना पालिकेने तयार केला असून उर्वरित दवाखान्याचे उद्दीष्ट या महिन्यात पूण केली जाणार आहे.

राज्यातील आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी शासनाने मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महापालिकांना ४७७ आरोग्यवर्धिनी केंद्र आणि आणि १४१ बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना उभारण्याचे उद्दीष्ट दिले आहे. त्यापैकी वसई विरार महापालिकेला ६५ आरोग्य वर्धिनी केंद्र (आयुष्यमान आरोग्य मंदिर) आणि १५ बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना असे एकूण ८० आरोग्य केंद्र उभारण्याचे उद्दीष्ट देण्यात आले आहेत. कमी वेळेत ही आरोग्य केंद्रे उभारण्याचे उद्दीष्ट पालिकेपुढे होते. त्यासाठी जागा शोधणे, केंद्र उभारणे, आरोग्य कर्मचाऱ्यांची भरती करणे अशा विविध स्तरावर पालिकेचे प्रयत्न सुरू होते. विविध अडचणींवर मात करत पालिकेने मार्च अखेर पर्यंत १० 'आरोग्यवर्धिनी केंद्र' आणि ११ 'आपला दवाखाना' सुरू केले होते. उर्वरित आरोग्य केंद्रांसाठी युध्दपातळीवर प्रयत्न सुरू होते. त्यासाठी पालिकेने जागा शोधून ही केंद्रे तयार केली आहे. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आणखी ११ आरोग्य केंद्रे नागरिकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आली आहेत. त्यामध्ये ३ आपला दवाखाना आणि ८ आरोग्यवर्धिनी केंद्राचा (आयुष्यमना आरोग्य मंदिर) समावेश आहे. यासाठी पालिकेने जागांचा शोध घेतला असून कंटनेर उभारून ही आरोग्यकेंद्रे सुरू करण्यात येत आहेत.

### ११ आरोग्य केंद्रे

१) धानीव तलाव- नालासोपारा
२) नारिंगी गाव, विरार
३) भोयदापाडा, वालीव नाका, वसई

### आरोग्यवर्धीनी केंद्रे

१) बरफपाडा, विरार
२) मोहक सिटी, विरार
३) गोकुळ टाऊनशीप, विरार
४) नंदाखाल, विरार
५) वटार, विरार
६) छेडानगर, नालासोपारा
७) म्हाडा कॉलनी, श्रीप्रस्थ नालासोपारा

### १५ पैकी १४ आपला दवाखाना सुरू

वसई विरार महापालिकेला १५ आपला दवाखान्याचे उद्दीष्ट देण्यात आले होते त्यापैकी १) कोपरी चंदनसार २) वसई इंडस्ट्रीयल इस्टेट, नवघर ३) परेरानगर, नायगाव ४) मनवेलपाडा ५) कुंभारपाडा ६) माणिकपूर ७) सिध्दार्थ नगर ८) आनंद नगर ९) सुयोग नगर १०) चक्रेश्वर तलाव ११) बापाणे नाका या ठिकाणी आपला दवाखाना सुरू करण्यात आला आहे. गुरूवारी आणखी ३ ठिकाणी आपला दवाखाना सुरू करण्यात आला आहे. उर्वरित एक आपला दवाखाना पुढील काही दिवसात तयार होणार असून आपला दवाखान्याचे उद्दीष्ट पूर्ण केल जाईल, असे पालिकेचे उपायुक्त समीर भूमकर यांनी सांगितले. उर्वरित आरोग्यवर्धिनी केंद्रे देखील लवकरच उभारण्यात येणार आहे.

### आपला दवाखाना

हा आपला दवाखाना राज्य शासनाच्या अनुदानातून सुरू करण्यात येत आहे. या दवाखान्यांमधून ३० प्रकारच्या चाचण्या करण्यात येतात. प्रत्येक दवाखान्यात एक वैद्यकीय अधिकारी, एक परिचारिका, एक फार्मसीस्ट आणि एक मदतनीस अशा चौघांची नियुक्ती असते. दवाखान्याची वेळ दुपारी २ ते रात्री १० अशी असेल.

### आरोग्यवर्धीनी केंद्रे

केंद्र शासनाने मधुमेह, रक्तदाब या सारख्या दिर्घकालीन असंसर्गजन्य रोगांवर उपचार करण्यासाठी आरोग्यवर्धीनी केंद्राची संकल्पना मांडली आहे. या आरोग्य केंद्रात नियमित आजारांच्या तपासणीसाठी बाह्य रुग्ण विभाग सेवा तसेच दीर्घकालीन संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगाची तपासणी व प्रतिबंध उपाययोजना, एच.बी. (हिमोग्लोबिन), मलेरीया चाचणी (बि.एस. एम.पी.)युरिन प्रेगनन्सी रॅपिड टेस्ट, मधुमेह तपासणी, डेंग्यू चाचणी, लसीकरण अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये एक डॉक्टर, एक अधिपरिचारिका (जेएनेएम), १ बहुउद्देशिय कर्मचारी (एमपीडब्ल्यू) आणि एक सहाय्यक आहेत. सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेत या आरोग्य केंद्रात नागरिकांना आरोग्य सुविधा देण्यात येतात.

# आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र ग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प

४१६ कोटी रुपये निधी वितरीत

मॅग्नेट प्रकल्प- (Maharashtra Agribusiness Network- M-GNET) महाराष्ट्र राज्यात आशियायी विकास बॅकेच्या (ADB) सहाय्याने डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी, सिताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी व मिरची (हिरवी व लाल), आंबा, काजू, लिंबू, पडवळ व फुलपिके या १५ पिकांची उत्पादन ते ग्राहकांपर्यंत वितरण अशा एकात्मिक मुल्य साखळ्यांचा विकास करण्यासाठी मॅग्नेट प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी आतापर्यंत रु.४१६.७१ कोटी (चारशे सोळा कोटी एकाहत्तर लक्ष) निधी वितरीत करण्यात आला आहे.

राज्यातील प्रमुख १४ फळपिके (डाळींब, केळी, संत्रा, मोसंबी, सिताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी व मिरची (हिरवी व लाल), आंबा, काजू, लिंबू, पडवळ) व सर्व प्रकारची फुले अशा एकूण १५ फलोत्पादन पिकांसाठी उत्पादन ते ग्राहकांपर्यंत वितरण अशा एकात्मिक मुल्य साखळ्यांचा विकास मॅग्नेट प्रकल्पामार्फत करण्यात येत आहेत.यामध्ये शेतकरी उत्पादक संस्था (FPOs), निर्यातदार, प्रक्रीयादार, संघटीत किरकोळ विक्रेते, कृषि व्यावसाय करणारे लघु व मध्यम उद्योजक, वित्तीय संस्था, स्वयंसहाय्यता समुह यांचा सहभाग आहे.

**प्रकल्पाचे मुख्य उद्देश –**

राज्यातील १४ फलोत्पादन पिकांच्या व फुलांच्या मुल्यसाखळ्यांमध्ये खाजगी गुंतवणुक आकर्षित करुन शेतक-यांचे उत्पन्नात वाढ करणे.फळे व भाजीपाल्याचे काढणीपश्चात नुकसान कमी करणे व त्यांची साठवणुक क्षमता वाढविणे.मागणीनुसार मालाची मुल्यवृद्धी करणे आणि वितरण व्यवस्था कार्यक्षम करणे.शेतकरी उत्पादक संस्थांचा मुल्यसाखळीतील सहभाग वाढविणे. प्रकल्पाचे हे उद्देश साध्य करण्यासाठी उत्पादक आणि उद्योजकांना नवीन व संघटीत बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी आवश्यक ते तांत्रिक सहाय्य, पायाभूत सुविधा उभारणीसाठी सहाय्य, मध्यम मुदत कर्ज आणि खेळते भांडवल पुरविणे.

मॅग्नेट प्रकल्पाचा वित्तीय आराखडा, कालावधी व अंमलबजावणी १४२.९ दशलक्ष अमेरीकन डॉलर्स. (सुमारे रू. ११००.०० कोटी) प्रकल्प राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ६ वर्षांसाठी (सन २०२१-२२ ते २०२७-२८ पर्यंत) राबविण्यत येत आहे. दि. २६ ऑक्टोबर २०२१ रोजी नवी दिल्ली येथे आशियाई विकास बँक व केंद्र शासन यांच्यामध्ये कर्ज करारावर व आशियाई विकास बँक, राज्य शासन व मॅग्नेट संस्था यांच्यामध्ये प्रकल्प करारावर स्वाक्षरी करण्यात आली. दि. ३१ डिसेंबर २०२१ रोजी Loan effective झाले आहे.

**मॅग्नेट प्रकल्पाची अपेक्षित फलनिष्पत्ती:**

पुढील ६ वर्षात या प्रकल्पाच्या अंमलबजावणीची पुढील प्रमुख फलनिष्पत्ती अपेक्षित आहेत

मॅग्नेट प्रकल्पातील समाविष्ट फलोत्पादन पिकांमधील शेतकरी उत्पादक संस्था व मुल्य साखळी गुंतवणुकदारांच्या एकूण ३०० उपप्रकल्पांना मदत करणे. सुमारे २ लाख शेतकऱ्यांना (पुरेशा महिला प्रतिनिधित्वासह) सर्व समावेशक व कार्यक्षम पर्यायी मूल्य साखळ्यांच्या माध्यमातून बाजाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील. सुमारे १०००० लोकांना रोजगार/स्वयंरोजगार संधी उपलब्ध होतील.

प्रकल्पातील विविध उपघटकांच्या अंमलबजावणीमुळे पिकांची गुणवत्ता व अन्न सुरक्षितता मानकांच्या अवलंबामुळे लाभार्थी शेतक-यांना किमान १० टक्के वाढीव किंमत मिळेल.

**प्रकल्पातील तीन मुख्य घटक –**

घटक १) शेतकरी उत्पादक संस्थांचा क्षमता विकास करणे – यामध्ये निवडण्यात आलेल्या १४ फलोत्पादन पिकांसाठी व फुलांसाठी शेतकरी उत्पादक संस्थांना उत्पादकता व गुणवत्ता वाढीसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आधुनिक पिक पद्धतींचा वापर, काढणी पश्चात हाताळणी, निर्यात व देशांतर्गत बाजारपेठेनुसार अन्न सुरक्षा आणि गुणवत्तांची पुर्तता करणे इ. विषयी प्रशिक्षण देण्यात येत आहे.

या घटकांतर्गत मॅग्नेट प्रकल्पात समाविष्ट फलोत्पादन पिकांमध्ये कामकाज करणा-या शेतकरी उत्पादक संस्थांना पुढील बाबींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

उत्तम कृषी पद्धती (GAP): गॅपबाबत संबंधित पिक उत्पादन क्षेत्रामध्ये (Crop Cluster) १ दिवसीय प्रशिक्षण देण्यात येते.

शेतकरी उत्पादक संस्थांच्या प्रतिनिधींसाठी व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण: मॅग्नेट प्रकल्पातील पिकांसाठी दोन दिवशीय व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण आयोजित करण्यात येते.शेतकरी उत्पादक संस्था / मुल्यसाखळी गुंतवणुकदार प्रतिनिधींसाठी काढणीपश्चात व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण: शेतकरी उत्पादक कंपन्या व मुल्य साखळी गुंतवणुकदारांचे प्रतिनिधींना दोन दिवशीय काढणीपश्चात व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण आयोजित करण्यात येते.शेतकरी उत्पादक कंपन्या व मुल्य साखळी गुंतवणुकदार यांचे प्रतिनिधींना निर्यातदार बनविण्याच्या दृष्टीने ५ दिवसीय निवासी फलोत्पादन निर्यात प्रशिक्षण देण्यात येते.

घटक २-अ) मुल्यसाखळीतील अंतर्भुत घटकांना (शेतकरी उत्पादक संस्था व खाजगी गुंतवणुकदार) काढणीपश्चात पायाभूत सुविधा उभारणीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे मॅचिंग ग्रॅन्ट या घटकांतर्गत शेतकरी उत्पादक संस्था आणि मूल्य साखळी गुंतवणूकदार यांच्या पात्र उपप्रकल्पांना काढणी पश्चात पायाभूत सुविधा उभारण्यासाठी पात्र प्रकल्प किंमतीच्या ६० % पर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते.

अर्थसहाय्य निकष:प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध होणारे आर्थिक सहाय्य हे मॅचिंग ग्रँट स्वरुपात असणार आहे. प्रत्येक प्रकल्पासाठी कमाल अनुदान हे पात्र प्रकल्प किंमतीच्या ६० % पर्यंन्त राहणार असून ते प्रति प्रकल्प जास्तीत जास्त सहा कोटी रुपये पर्यंत देय असणार आहे.मंजूर अनुदानाचे वितरण लाभार्थी संस्थेला तीन टप्प्यांमध्ये करण्यात येते.

घटक २ – ब) – शेतकरी उत्पादक संस्था व मुल्य साखळी गुंतवणुकदार यांची खेळत्या भांडवलाची व मध्यम मुदत कर्जाची गरज भागविण्यासाठी भागीदारी वित्तीय संस्थांमार्फत सवलतीच्या व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणे .राज्यातील मॅग्नेट प्रकल्पातील फलोत्पादन पिकांमध्ये कामकाज करणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्था व मुल्यसाखळी गुंतवणुकदारांची मध्यम मुदत कर्ज व खेळत्या भांडवलाची गरज विचारात घेवुन आशियाई विकास बँकेमार्फत ऋखङ या घटकाचा समावेश मॅग्नेट प्रकल्पामध्ये केलेला आहे. या घटकाअंतर्गत एकुण वित्तीय आराखडा रु.४८५.०० कोटी रुपये इतका आहे. रू. ४८५.०० कोटींपैकी Financial Intermediation Loan (FIL) या घटकाच्या अंमलबजावणीसाठी निवड करण्यात आलेल्या बँक ऑफ इंडिया, फेडरल बँक व समुन्नती फायनान्सियल इंटरमेडीएशन ॲन्ड सर्व्हीसेस प्रा. लि. या तीन वित्तीय संस्थांची निवड करण्यात आलेली आहे. शेतकरी उत्पादक संस्था व मुल्य साखळी गुंतवणुकदार यांना वित्तीय संस्था सदर कर्जासाठी सद्यस्थितीत जवळपास १० % इतका व्याजदर आकारणी करतात.

घटक ३) निवडण्यात आलेल्या फलोत्पादन पिकांसाठी मुल्य साखळ्या विकसित करणे – यामध्ये महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या १६ सुविधांचे विस्तारीकरण /आधुनिकीकरण, तीन नवीन सुविधांची उभारणी आणि राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेचे बळकटीकरण इ. बाबींचा समावेश आहे. या घटकाची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत करण्यात येत आहे.

**–दत्तात्रय कोकरे** /वि.स.अ

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभासाठी

# बँक खाते आधारशी लिंक करावे : रोहन घुगे

ठाणे : 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ मिळावा यासाठी ठाणे जिल्ह्यातील महिलांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यापैकी अनेक महिलांचे अर्ज हे पात्र ठरले असून त्यांच्या खात्यात आता पैसेही येऊ लागले आहेत. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांच्या आधार लिंक बँक खात्यात दर महिन्याला १,५०० रुपये जमा केले जातील. यासाठी संबंधित महिलेचे बँक खाते आधारशी लिंक करावे असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे. सरकारने महिलांच्या खात्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे मिळून ३००० रुपये जमा करण्यास सुरुवात केली असून मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करताना लाभाची रक्कम थेट (उ्रढ द्वारे) अर्जात नमूद केलेल्या आधार क्रमांकाशी जोडलेल्या बँक खात्यात जमा केली जाईल. त्यामुळे महिलांनी त्यांची बँक खाती आधारशी लिंक करणे आवश्यक आहे. बँक खात्याचे ई-केवायसी करणे देखील आवश्यक आहे. जवळच्या सेतू केंद्रावर ई-केवायसी करता येते. मात्र, बँक खाते आधार संलग्न करण्याची प्रक्रिया संबंधित बँकेला भेट देऊन करून घेण्याचे आवाहन जिल्हा परिषद मार्फत करण्यात येत आहे.

# करंजा बंदरात अखेर मासळी बाजार सुरू

उरण : मुंबईतील ब्रिटिशकालीन ससून व भाऊचा धक्का बंदरात उतरविण्यात येणारी मासळी आता करंजा येथे उरणच्या करंजा बंदरात खरेदी-विक्री सुरू करण्यात आली आहे. स्वातंत्र्यदिनी उरणचे आ. महेश बालदी यांच्या हस्ते काट्याचे पूजन करून ही सुरुवात करण्यात आली. या वेळी स्थानिक मच्छीमारांनी आनंद व्यक्त केला. त्यामुळे ग्राहकांना घाऊक व स्वस्त मासळी मिळण्याचे मुंबईऐवजी नवीन ठिकाण उपलब्ध झाले आहे.

मासळी खरेदी करायची असेल तर उरणच्या करंजा बंदरात या, असे आवाहन येथील मच्छीमार संस्था आणि मच्छीमारांनी केले आहे. केंद्र व राज्य सरकारच्या १५० कोटी रुपयांच्या भागीदारीतून करंजा येथे एकाच वेळी ७५० मासेमारी बोटी उभ्या करून मासळीची खरेदी-विक्री करण्याची व्यवस्था असलेले करंजा बंदर सुरू झाले आहे.

नव्या हंगामामुळे नारळी पौर्णिमेनंतर मासेमारी करणाऱ्या बोटी दररोज येऊ लागतील. त्यामुळे या बंदरातील मासेमारी करणारा व्यावसायिक सध्या सुखावला आहे. बालदी यांनी करंजा बंदराच्या उर्वरित कामांसाठी १५४ कोटींचा निधी लवकरच मंजूर होईल आणि त्यानंतर बंदराचे काम पूर्ण करण्यात येईल. मात्र त्यापूर्वी मासळी खरेदी-विक्रीसाठी मत्स्यव्यवसाय विभागाद्वारे तात्पुरती व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले. या बंदरामुळे अनेकांना रोजगार मिळणार आहे. भविष्यात करंजा हे बंदर करंजा-रेवस सागरी पुलामुळे मुंबईला सर्वात जवळचे बंदर ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

***मुंबईतील ससून डॉकमध्ये मासळीचा व्यवहार करणे जिकिरीचे झाले होते. त्या ठिकाणी वाढत्या गर्दीमुळे मासेमारांना दूरवरच्या कसारा बंदरात जाऊन मासळीची विक्री करावी लागत होती. आता ही सुविधा करंजा बंदरातच उपलब्ध झाल्याने रोजगार आणि मासळी विक्रीची सोय होणार आहे.***
***– प्रदीप नाखवा, अध्यक्ष, करंजा मच्छीमार संस्था***

# विरोधकांचा खोटा अपप्रचार खोडून काढा : आ. प्रशांत ठाकूर

पनवेल : साफ नियत आणि स्पष्ट निती घेऊन भाजप काम करत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील देशात तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या विकासाचा आलेख उंचावत आहे. मात्र विरोधक अपप्रचार करून समाजामध्ये विष पसरविण्याचे काम करत आहे, तो खोटा अपप्रचार खोडून काढण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जागरूकपणे काम करावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (दि. १६) पनवेल ग्रामीण मंडलाच्या विस्तारित कार्यकारिणी बैठकीत केले. भारतीय जनता पार्टीच्या पनवेल ग्रामीण मंडल विस्तारित कार्यकारिणीची बैठक आकुर्ली येथील काकाजीनी वाडी येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले कि, भाजप निवडणूक जिंकण्यासाठी नाही तर सर्वसामान्य माणसाच्या उत्कर्षासाठी योजना अंमलात आणते. या योजना कायम राहण्यासाठी सत्ता आवश्यक असते. त्यामुळे निवडणूक जिंकणे जरुरीचे असते. काँग्रेसच्या काळात योजनांचा लाभ सर्वसामान्य माणसाला मिळत नव्हता त्या तुरळक आणि फक्त कागदोपत्री असायच्या. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान म्हणून देशाची सूत्रे हाती घेतल्यापासून सर्व योजनांचे पैसे लाभार्थ्याला थेट त्याच्या बँक खात्यात जमा होऊन पारदर्शकता निर्माण झाली. देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम झाले पुढे ते सुप्रीम कोर्टापर्यत टिकवले मात्र त्याचवेळी उद्धव ठाकरे यांचे सरकार स्थापन झाल्यानंतर ते आरक्षण टिकवण्यासाठी महाविकास आघाडीने कोर्टात बाजू मांडली नाही म्हणूनच ते आरक्षण टिकले नाही. एक दोन अपवाद वगळता कायम काँग्रेस राष्ट्रवादीची सत्ता राज्यात राहिली आहे मग अनेक वर्षे सत्ता असतानाही त्यांनी मराठा समाजाला आरक्षण का दिले नाही, असा सवाल उपस्थित करत मराठा आणि ओबीसी सामाजात आरक्षणाच्या मुद्यावरून समाजामध्ये विष कालवण्याचे काम महाविकास आघाडी करत असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून विविध लोककल्याणकारी योजना अंमलात आणल्या आहेत त्या बंद करण्यासाठी नाही तर तहयात सुरु राहण्यासाठी. मात्र या योजनांच्या




बाबतीत पण सध्या खोटा प्रचार महाविकास आघाडीकडून केला जात आहे. योजना बंद करावी म्हणून काँग्रेस न्यायालयात गेला होता असे सांगून योजना लोकांपर्यंत मिळू नयेत यासाठी विरोधक कष्ट घेत आहेत, असेही त्यांनी अधोरेखित केले.

भ्रष्टाचार करणारे सरकारवर टीका करत असतात, त्याचे जिवंत उदाहरण पनवेलमध्ये कर्नाळा बँकेचे आहे. हा धागा पकडून आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हंटले कि, शेकापवाले सांगतात खातेदारांचे पैसे मिळवून दिले मात्र प्रत्यक्षात हे पैसे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाच लाखपर्यंतच्या रक्कमेला विमा संरक्षण निर्णयातून मिळाले आहे. असे असतानाही शेकापचे पुढारी गमजा मारतात मग पाच लाखावरील ठेवी शेकापने खातेदारांना का दिले नाहीत असा सवालही निमित्ताने उपस्थित केला. पैशासाठी लोकांनी विवेक पाटीलांकडे फेऱ्या मारल्या ठेवीदार घरी जायचे तासनतास बसायचे पण विवेक पाटील त्यांना भेटले नाहीत जेव्हा खारघरच्या शाखेत खातेदारांनी पैसे घेतल्याशिवाय जाणार नाही असा निर्धार केला त्यावेळी रात्री साडे दहा वाजता ते भेटायला आले आणि मी पैसे खाल्ले असतील तर स्वतः ला जाळून घेईन अशी गर्जना विवेक पाटील यांनी केली होती. मुलाला वाचवताना स्वतः पैसे घेतल्याची कबुली विवेक पाटील यांनी दिली आणि तसा शपथपत्र ही केला मग असे असतानाही शेकापवाले उजळ माथ्याने भ्रष्टाचाऱ्याचे बॅनर लावून गमजा मारत आहेत. यावरूनच यांची नीती काय आहे ते स्पष्ट होत आहे, असा टोला त्यांनी लगावत शेकापच्या खोट्या नीतिमत्तेचा खरपूस समाचार घेतला. समाजाचे हित जपण्याचे काम महायुतीकडून होत आहे मात्र महाविकास आघाडी अफवांचे पीक आणून लोकांची दिशाभूल करत आहे. संविधान बदलण्याची अफवा विरोधकांनी केली आणि आरक्षण संपणार अशी भीती प्रचारातून घालण्यात आली त्यामुळे लोकसभा निवडणुकीत फेक नॅरेटिव्ह पसरवून महाविकास आघाडीने जनतेची फसवणूक केली, मुख्य म्हणजे संविधान कधीही बदलला जाणार नाही त्यामुळे असा कधीही प्रचार झाला तर त्याच्यावर विश्वास ठेवू नका, असे आवाहनही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या बैठकीच्या माध्यमातून केले.

# नगररचना विभागाला टाळे ठोको आंदोलनाबाबत पालिकेचे उत्तर

भाईंदर :मिरा भाईंदर महापालिकेचे हक्काचे भूखंड बिल्डरांच्या घशात घातल्याबाबतची माहिती आमदार प्रताप सरनाईक यांनी जुलै महिन्यात पत्रकार परिषद घेऊन उघड केली होती. याबाबत आमदार सरनाईक यांनी आक्रमक होत महापालिकेच्या हक्काच्या जागा महापालिकेला त्वरित रीतसर प्रक्रिया पूर्ण करून ताब्यात मिळाल्याच पाहिजेत अशी भूमिका घेतली होती. १६ ऑगस्टला महापालिकेच्या नगररचना विभागाला टाळे ठोकण्याचा इशारा आमदार प्रताप सरनाईक यांनी दिला होता.

आमदार प्रताप सरनाईक यांनी इशारा दिल्यावर खडबडून जागे झालेल्या महापालिका प्रशासन व नगररचना विभागाने लेखी उत्तर आमदार सरनाईक यांना दिले आहे. सकारात्मक कार्यवाही सुरु असल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. पण जर पुढील काही दिवसात राहिलेले काही भूखंड महापालिकेच्या ताब्यात नियमानुसार आले नाहीत तर प्रशासनाला पुन्हा आंदोलनाला सामोरे जावे लागेल असे आमदार सरनाईक यांनी ठणकावून सांगितले आहे.

महापालिका प्रशासन करत असलेली कार्यवाही व लेखी उत्तर पाहता सध्याचे टाळे ठोको आंदोलन तूर्त स्थगित करत असलो तरी महापालिकेने दिलेल्या लेखी आश्वासनांनुसार सर्व कार्यवाही महापालिका पुढील काही दिवसात पूर्ण करेल असे वाटते. अन्यथा आंदोलन करावेच लागेल असे आमदार प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे.

भिवंडी शहराचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल प्रसिध्द

# शहरातील प्रदूषण पातळीत घट : आयुक्त अजय वैद्य

भिवंडी : शासनाच्या नियमांनुसार दरवर्षी पर्यावरण सद्यस्थिती अहवाल प्रकाशीत करावा लागतो. त्यानुसार भिवंडी शहराच्या पर्यावरण सद्यस्थिती अहवाल पालिका आयुक्त अजय वैद्या यांच्या हस्ते दि.१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून करण्यात आला. पालिकेतील स्व. विलासराव देशमुख सभागहात आरोग्य कामगार यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी हा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल प्रसिध्द करण्यात आला.

यावेळी व्यासपिठावर पालिका अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, समाज कल्याण उपायुक्त डॉ. अनुराधा बाबर, प्र. शहर अभियंता सचिन नाईक, पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता संदीप पटनावर, आरोग्य विभागाचे सहायक आयुक्त फैसल तातली, जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले, पर्यावरण विभागाचे संजय केणे, विभाग प्रमुख अनिल आवाड अन्य विभाग प्रमुख उपस्थित होते.




पर्यावरण अहवाल प्रसिध्दी करताना पालिका आयुक्त अजय वैद्य म्हणाले की, हा पर्यावरण अहवाल तयार करताना महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रातील पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करण्याच्या प्रक्रिया दरम्यान विविध पर्यावरणीय घटकांचे मूल्यमापन करण्यासाठी प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आली यात हवेची गुणवत्ता, पाण्याची गुणवत्ता, तलावाच्या पाण्याची गुणवत्ता, नाल्यामधील पाण्याच्या नमुन्याचे विश्लेषण, शहरातील उद्यानाची स्थिती, वृक्ष विविधता आणि आवाजाची पातळी हे घटक लक्षात घेण्यात आले. तसेच पालिका क्षेत्रातील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि इतर शासकीय संस्थांकडून माहिती गोळा करण्यात आली आहे या अहवाला दिलेल्या शिफारसी विविध अधिकृत स्त्रोतांकडून गेले. या माहितीवरून तयार करण्यात आले आहेत असे पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी नमूद केले. भिवंडी शहरातील प्रदुषणाची पातळी फार कमी झाली आहे, असे पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी नमूद केले.

# २२ ऑगस्ट संभाजी ब्रिगेडचे राज्यस्तरीय अधिवेशन

मुंबई : महाराष्ट्र धर्म जागवण्यासाठी आणि वाढवण्याच्या प्रबळ हेतुने !२ ऑगस्ट रोजी नवी मुंबईत संभाजी ब्रिगेडचे राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित करण्यात आले असल्याची माहिती व्हा प्रविण गायकवाड यांनी आज प्रसिद्धी माध्यमांना दिली. महाराष्ट्राच्या इतिहास, सांस्कृतिक, सामाजिक व अर्थकारणाच्या क्षेत्रात गेली २७ वर्षे सातत्याने काम करून मराठा-बहुजन समाजात वैचारिक बदल घडवून आणणाऱ्या संभाजी ब्रिगेड संघटनेचे हे एकदिवसीय राज्यस्तरीय अधिवेशन. २२ ऑगस्ट २०२४ रोजी वाशी (नवी मुंबई) येथील विष्णुदास भावे नाट्यगृह याठिकाणी सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत हे अधिवेशन पार पडणार आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन आ. रोहित पवार, खा. अमोल कोल्हे, आ. शशिकांत शिंदे तसेच सिनेअभिनेते सयाजी शिंदे, निखिल चव्हाण व गौरव मोरे आदि मान्यवरांच्या हस्ते पार पडणार आह

ज्येष्ठ नेते शरदचंद्रजी पवार, खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, विजयसिंह मोहिते पाटील आदि मान्यवर या अधिवेशनासाठी उपस्थित राहणार असून संभाजी ब्रिगेडच्या बदलाचा मागोवा व भविष्याचा वेध घेण्यासाठी हजारोंच्या संख्येने अधिवेशनासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष व अधिनेशनाचे निमंत्रक प्रविणदादा गायकवाड यांनी केले आहे.

पहिल्या सत्रामध्ये पत्रकार अभिजीत करंडे हे गोष्ट पैशापाण्याची या विक्रमी पुस्तकाचे लेखक प्रफुल्ल वानखेडे यांची मुलाखत घेणार आहेत. तर दुसऱ्या सत्रामध्ये ज्येष्ठ संपादक श्रीराम पवार हे महाराष्ट्र धर्म काय शिकवतो? या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तिसऱ्या सत्रामध्ये निर्भिड पत्रकार निरंजन टकले हे गांधीजींच्या स्वप्नातील भारत या विषयावर संबोधित करणार असून लेखक चंद्रकांत झटाले या सत्रासाठी उपस्थित राहणार आहेत. चौथ्या सत्रामध्ये ज्येष्ठ संपादक ज्ञानेश महाराव हे भारतीय राज्यघटनेला अभिप्रेत असलेल्या विचारधारेची लोकशाही या विषयावर आपले मनोगत व्यक्त करणार असून खा. भास्कर भगरे व सामाजिक कार्यकर्ते प्रदिप सोळुंके हे या सत्रामध्ये उपस्थित असणार आहेत.



*भारतीय स्वातंत्र्य दिवसानिमित्त अर्थात १५ ऑगस्ट २०२४ रोजी गौतम हिंदी माध्यमिक विद्यालयतील १६ गरजू मुलामुलींना, विद्यार्थी यांना शाळेतले गणवेश जितेंद्र देवराज शर्मा यांच्यातर्फे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्यध्यापिका कामायनी सप्रेम ठाकूर व प्राध्यापिका शिल्पा आशिष गौतम उपस्थित होते.*

# जागतिक छायाचित्र दिनानिमित्त आजपासून ठाण्यात सुरू होणार छायाचित्र प्रदर्शन

ठाणे (गणेश भोईटे) : जागतिक छायाचित्र दिनानिमित्ताने (१९ ऑगस्ट'ठाणे महानगरपालिका' आणि 'ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ' यांच्या संयुक्त विद्यमाने',ठाणे महापालिका चषक २०२४ या राष्ट्रीय छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शन आजपासून (१७ ऑगस्ट) पासून सुरू झाले असून सदर प्रदर्शन २० ऑगस्ट २०२४ पर्यत सुरू राहणार आहेत. या स्पर्धेतील विजेते ठरलेल्या छायाचित्रकारांच्या छायाचित्रांचा समावेश देखील या प्रदर्शनात करण्यात आला असून ठाणेकर नागरिकांनी या प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

तीन हात नाका येथील हिंदुहृदसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारक येथे भरविण्यात आले असून २० ऑगस्टपर्यत सकाळी १० ते रात्री ९ या वेळेत सदरचे प्रदर्शन नागरिकांसाठी खुले राहणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा तीन स्तरांमध्ये सदरची स्पर्धा घेण्यात आली.

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी 'Wild Life' या विषयात प्रथम पारितोषिक हिरा पंजाबी, द्वितीय संदीप यादव, तृतीय लाझरस पॉल यांनी तर उत्तेजनार्थ पारितोषिक हिरा पंजाबी आणि बिजू बोरो यांना प्राप्त झाले आहे.'Performing Art', या विषयामध्ये प्रथम पारितोषिक गणेश नामदेव मेमाने, द्वितीय मनोज गोविंद मुसळे, तृतीय संजय बप्हाटे यांनी पटकाविला असून उत्तेजनार्थ क्रमांक शंतनु बोसे, अरुल डॅनम होरिझन यांना मिळाले.

'Festival', या विषयामध्ये प्रथम राकेश रावळ, द्वितीय शरद पाटील, तृतीय आकाश येवगे यांनी पटकाविले असून उत्तेजनार्थ पारितोषिक श्रवण तांडलिया व शंतनु दास यांनी पटकाविले. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेतील तिन्ही विषयांसाठी प्रथम क्रमांकाचे प्रत्येकी ५०,०००/- द्वितीय क्रमांकासाठी प्रत्येकी रु.२५,०००/ तृतीय क्रमांकासाठी प्रत्येकी रु. १५,०००/- चौथे व पाचवे पारितोषिक प्रत्येकी रु.३,०००/- देण्यात येणार आहे.

राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी ठेवण्यात आलेल्या 'News Photo' या विषयामध्ये प्रथम पारितोषिक सतेज शरद शिंदे, द्वितीय अरुल होरिझन, तृतीय अंशुमन पोयरेकर यांनी प्राप्त झाले असून उत्तेजनार्थ पारितोषिक दिपक जोशी व के.के. चौधरी यांनी पटकाविले. 'Photo Features (story) या विषयात प्रथम पारितोषिक अमित चक्रवर्ती, द्वितीय नागोंडा पाटील, तृतीय सतीश विष्णु काळे यांनी पटकाविले आहे.

# केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक स्थापन, नवी मुंबईतील अतिक्रमणांवरील कारवाईतील टाळाटाळ रोखली जाणार

नवी मुंबई : शहरात अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले असून त्यावरील कारवाईत टाळाटाळ केली जात असल्याचे निदर्शनास आले. तसेच फेरीवाल्यांना कारवाईचा आधीच सुगावा लागत असल्याने अडचणी येतात. परंतु, आता पालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार सात जणांचे मुख्यालय स्तरावर केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक निर्माण केले आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या आठ विभाग अधिकाऱ्यांना शहरातील कोणत्याही विभागात केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक त्या ठिकाणी कारवाईचे आदेश देईल तेथे कारवाई करावी लागणार असून त्यामुळे अतिक्रमणविरोधी कारवाईत पारदर्शकता येणार आहे.

उच्च न्यायालयाने ३१ डिसेंबर २०१५ आधीची आणि नंतरची किती बेकायदा बांधकामे उभी राहिली आहेत याचे सर्वेक्षण करा तसेच २०१५ सालानंतरच्या बेकायदा बांधकामांवर कायद्यानुसार कारवाई करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने यापूर्वीच नवी मुंबई महापालिकेला दिले आहेत. नवी मुंबईत सुमारे चार हजारांच्या वर अनधिकृत बांधकामे आहेत. आता मुख्यालय स्तरावरच केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथक निर्माण केल्याने आता शहरात कारवाईचा सपाटा पाहायला मिळणार असून लागेबांधे निर्माण झाल्याने कारवाईत होणारी टाळाटाळ संपुष्टात येणार आहे.

विभाग कार्यालयातील फेरीवाल्यांच्या कारवाईसाठी जाणाऱ्या पथकातील काही जणांचे हितसंबंध निर्माण होऊन अतिक्रमण पथक पोहोचण्याआधीच फेरीवाले तिथून जात असल्याचे पाहायला मिळत होते. आता कोणत्याही विभागातील कारवाईसाठीचे तात्काळ निर्देश मिळणार असल्याने छुपी सौदेबाजी तसेच कारवाईतील टाळाटाळ रोखली जाणार आहे. शहरात अनधिकृत बेकायदा बहुमजली इमारतींची संख्याही मोठी आहे. पालिका फक्त नोटीस बजावून संबंधित सदनिका अनधिकृत असून या ठिकाणी नागरिकांनी सदनिका खरेदी करू नये असे आवाहन करते. याच अनधिकृत बांधकामांकडे केलेल्या दुर्लक्षामुळे हजारो नागरिकांची फसवणूक होत आहे, आता त्यावर अंकुश येणार आहे. पालिका अधिकाऱ्यांकडून अतिक्रमणाबाबत काणाडोळा केला जात होता. अनेक विभागांत वर्षानुवर्षे तेच तेच अधिकारी अतिक्रमण विभागावर ठाण मांडून बसल्यामुळे अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली जात नव्हती, आता त्याला आळा बसणार आहे.


केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथकात अतिक्रमण उपायुक्त, साहाय्यक आयुक्त अतिक्रमण मुख्यालय, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, मुख्यालय, लिपिक, लघुटंकलेखक यांचा समावेश करण्यात आला आहे.

*केंद्रीय अतिक्रमण दक्षता पथकाद्वारे कोणत्याही विभागातील अनधिकृत बांधकामे, फेरीवाले, रहदारीतील अडथळे, बेवारस वाहने यांच्यासह अनधिकृत इमारतींवरही कारवाई करण्यात येईल. कारवाईचे आदेश मिळाल्यानंतर त्या विभागात जाऊन इतर विभागांतील अधिकाऱ्यांना कारवाई करावी लागणार असल्याने जाणीवपूर्वक केली जाणारी टाळाटाळ, दिरंगाई टाळून कारवाईचा वेग वाढणार आहे.*

**–डॉ. अमोल पालवे,** साहाय्यक आयुक्त
अतिक्रमण विभाग, मुख्यालय

सेवाव्रती उषा केळकर आणि बलुकाका पेंडसे यांचा

# न्या. अभय ओक यांच्या हस्ते रविवारी होणार गौरव





ठाणे : जन्मभूमी पेक्षा कर्मभूमीच श्रेष्ठ मानून ज्यांनी शाळेची जवळपास तीन ते चार दशके निरलसपणे सेवा केली अशा शिक्षण सेवेचे व्रत अंगीकारलेल्या सेवाव्रती उषा मुकुंद केळकर (वय ९५) आणि गणेश हरी उपाख्य बलुकाका पेंडसे (वय ९१) या दोघांचा अभीष्टचिंतन सोहळा मो.ह. विद्यालयाच्या प्रांगणात १८ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता संपन्न होणार आहे. न्यायिक क्षेत्रातील मूल्य जपणारे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अभय ओक आपल्या गुरुजनांसाठीच या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी पद भूषवणार आहेत. उषाताई केळकर संगीताच्या उत्तम शिक्षिका तर बलूकाका पेंडसे सर शारीरिक शिक्षणाचे लाडके शिक्षक. संपूर्ण शाळा हे एक कुटुंबच आहे असे मानून मो.ह. परिवारातल्या प्रत्येकाला एका प्रेमळ धाग्याने अखंड बांधून ठेवण्याचं अजोड काम या दोहोंनी केले. निवृत्त होऊनही जवळपास तीन दशके लोटली तरीही शाळेबद्दल, संस्थेबद्दलचे त्यांचे प्रेम यत्किंचितही कमी झालेले नाही. शाळेत होणाऱ्या प्रत्येक उपक्रमाला हजर राहून कुटुंब प्रमुखाची भूमिका ते बजावत असतात. आनंद, उत्साह आणि सकारात्मक ऊर्जेचे जणू हे दोघे अक्षय पात्र आहेत. संस्कारांची पाठ राखण करणाऱ्या मो.ह. परिवाराला यांचा अत्यंत अभिमान आणि कौतुक आहे म्हणूनच या सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शाळेने दिली आहे.

# रविवारी साई फाऊंडेशनतर्फे दहीहंडी सराव शिबिर

ठाणे : साई फाऊंडेशच्यावतीने ठाण्यात भव्य दिव्य दहीहंडी उत्सवानिमित्त सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले असून यंदाचे २ रे वर्ष आहे. तसेच उत्सवाचे औचित्य साधून गरजू विद्यार्थ्यांसाठी साई फाऊंडेशन विद्यार्थी दत्तक योजनेचा शुभारंभ सोहळा यावेळी होणार असल्याची माहिती उत्सवाचे आयोजक, साई फाऊंडेशचे संस्थापक अध्यक्ष चेतन सुकाळे आणि ठाणे महापालिकेतील माजी विरोधी पक्षनेते हणमंत जगदाळे यांनी आज एका पत्रकार परिषदेत दिली.

गोकुळ अष्टमीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात मुंबई येथून गोविंदा पथके ठाणे शहरात येतात. ठाणे जिल्ह्यातही अनेक गोविंदा पथके असून एक महिना आधिपासूनच त्यांचा थर लावण्याचा सराव सुरु झाला आहे. या गोविंदा पथकांना सरावाचे व्यासपीठ देण्यासाठी सावरकर नगर येथील ठाणे महापालिकेच्या शाळा क्रं १२० येथे रविवार, दि. १८ ऑगस्ट रोजी सायं ५ ते १० या वेळेत सराव शिबिराचे आयोजन केल्याची माहिती चेतन सुकाळे यांनी दिली. येणाऱ्या प्रत्येक मंडळांना आकर्षक ट्राफी देणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. तसेच या वर्षी फाऊंडेशनने स्पर्धकांसाठी रील स्पर्धा देखील आयोजित केली आहे. यासाठी फाऊंडेशने रोख रक्कम ३ पारितोषिक देण्याचे जाहीर केले आहे.



साई फाऊंडेशन विद्यार्थी दत्तक योजनेचा शुभारंभ यावेळी होणार आहे. ही योजना (शासकीय शाळा मान्यता प्राप्त संचालित) या शाळेमधील इयत्ता ५ वी ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येणार आहे. विद्यार्थ्याने मागील शैक्षणिक वर्षात किमान ए आणि बी ग्रेड मिळविलेला असावा किंवा ७५ टक्के पेक्षा जास्त गुण असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे पालक नसल्यास १०० टक्के फी या योजनेअंतर्गत संस्थेच्या वतीने भरली जाणार आहे. विद्यार्थ्याला पालक (आई) असल्यास ५० टक्के फी भरण्यात येणार आहे. पालकाचे वार्षिक उत्पन्न १.५० लाखांच्या आत असणे आवश्यक असल्याचे चेतन सुकाळे यांनी सांगितले.

वार्षिक शुल्काबरोबरच विद्यार्थ्यांना अन्य शैक्षणिक सुविधाही दिल्या जाणार आहेत. शालेय गणवेश / दप्तर, वह्या-पुस्तके, शालेय वस्तूही मदत म्हणून देणार असल्याची माहिती चेतन सुकाळे यांनी दिली.

शारदा एज्युकेशन सोसायटी संस्थेचा

# वर्धापन दिन आणि स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण



ठाणे : शारदा एज्युकेशन सोसायटी संस्थेचा वर्धापन दिन व भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन शारदा एज्युकेशन सोसायटीचे आनंद विश्व गुरुकुल येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण व राष्ट्रगीत गायनाने झाली. त्यानंतर एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी ध्वजाला मानवंदना देत एनसीसी व एनएसएस या विद्यार्थ्यांनी गीत गायले. तसेच एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले. संस्थेच्या सदस्या व आनंद विश्व गुरुकुल ज्येष्ठ रात्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. हर्षदा लिखिते यांनी या दिनाचे महत्त्व वेगवेगळ्या उदाहरणांद्वारे सांगितले. संस्थेचे सचिव प्रा. डॉ. प्रदिप ढवळ सर यांनी विद्यार्थ्यांना उत्तम नागरिक होण्यासाठी आपल्या भाषणातून स्फुरण दिले. स्वातंत्र्य दिनानिमित्त शाळेचे विद्यार्थी व महाविद्यालयाचे विद्यार्थी यांनी आपले देशप्रेमव्यक्त भाषण सादर केले.

कार्यक्रमाच्या वेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. मिलिंद जोशी यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांमधील देशभक्ती जागृत करत विद्यार्थ्यांना सुजाण नागरिकाचे कर्तव्य पार पाडण्यास सांगितले. कार्यक्रमाला उपस्थित संस्थेचे अध्यक्ष विलास ठुसे यांनी देखील आपले मनोगत मांडत विद्यार्थ्यांना चांगले व सुजाण नागरिक होण्याची प्रेरणा दिली. यावेळी संस्थेच्या सदस्या डॉ. नमिता बिवलकर, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा हर्डीकर, डॉ. प्रांजली ढवळ उपस्थित होत्या.

१५ ऑगस्ट हा दिवस शारदा एज्युकेशन संस्थेचा वर्धापन दिन देखील असल्यामुळे संस्थेचा १६ वा वर्धापन दिन हा गुरुकुलच्या आवारात सत्यनारायण पूजेच्या सोहळ्याने साजरा करण्यात आला. या सोहळ्याला संस्थेचे सर्व पदाधिकारी, गुरुकुलचे सर्व विभागाचे प्राचार्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' योजनेत निवड झालेल्या १० प्रातिनिधिक युवा लाभार्थ्यांना स्वातंत्र्यदिनी लाभ

ठाणे : कुशल व रोजगारक्षम महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' जाहीर केली असून महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने ही योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेव्दारे राज्यातील युवकांना उद्योगांमध्ये प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाव्दारे (इंटर्नशिप) रोजगारक्षम करून उद्योगांकरिता कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. या योजनेचा लाभ १८ ते ३५ वयोगटातील युवक घेऊ शकणार असून ६ महिने कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) कालावधी असणार आहे. उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत विद्यावेतन मिळणार असून १२ वी उत्तीर्णांना रु. ६ हजार, आय.टी.आय व पदविका उत्तीर्णांना रु. ८ हजार तसेच पदवीधर आणि पदव्युत्तर उत्तीर्ण उमेदवारांना रु.१० हजार दरमहा विद्यावेतन मिळणार आहे.





याकरिता शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे व विविध क्षेत्रातील प्रकल्प, उद्योग, स्टार्टअप, आस्थापनांनी आवश्यक मनुष्यबळाची मागणी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदविणे गरजेचे आहे. त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेत ६ महिन्यांच्या कालावधीकरिता शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण देणेकरिता ३० संवर्गातील एकूण १९४ पदांसाठी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले.

अशाच प्रकारचे शिबिर यापूर्वीच जाहीर केल्याप्रमाणे उर्वरित पदांसाठी २० ऑगस्ट २०२४ रोजी, सकाळी १० वाजता नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, भूखंड क्र.१, सेक्टर १५ ए, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. याप्रसंगी इच्छुक उमेदवारांनी आपले संपूर्ण नाव, पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता, भ्रमणध्वनी / दूरध्वनी क्रमांक, मेल-आयडी, शैक्षणिक अर्हता, जन्मतारीख, बँक तपशील इ. कागदपत्रांसह उपस्थित रहावे असे सूचित करण्यात येत आहे. यामध्ये प्रथम येणाऱ्या उमेदवाराला प्रथम प्राधान्य देण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी तसेच नियुक्तीच्या अनुषंगाने शासनाकडील दि. ९ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयामधील सर्व अटी व शर्ती उमेदवारावर बंधनकारक राहतील याची नोंद घ्यावी असे सूचित करण्यात आले आहे.

तरी पात्र युवकांनी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'चा लाभ घेण्यासाठी २० ऑगस्ट २०२४ रोजी महापालिका मुख्यालयात आयोजित शिबिरास आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१